# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १६ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ११/०९/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. **११/०९/२०१९** बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बेंडाळे उज्वला मोहन | कापसे मयुर चंद्रकांत |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | पाटील प्रतिभा सुधिर |
| पोकळे दिलीप बबनराव | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| खडके सुनिल वामनराव | भंगाळे विष्णू रामदास |
| कोल्हे प्रविण रामदास | बरडे नितीन मनोहर |
| सनकत चेतन गणेश | बागवान रियाज अहमद अब्दुल करीम |

सदर सभेस, मा.आयुक्त, श्री.उदय टेकाळे, मा.उपायुक्त. श्री. अभिजीत मुठे, मा.उपायुक्त. श्री. उत्कर्ष गुटे, मा.उपायुक्त. श्री. मिनानाथ दंडवते, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

मा.सभापती :- नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव:- जळगांव शहर महानगरपालिकेत शासनाकडुन दोन उपायुक्त नविन आलेले आहेत एक उपायुक्त आहे श्री.दंडवते साहेब व दुसरे आहेत श्री.गुटे साहेब यांचे स्वागत आहे .**

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि. ०४/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

श्री.विष्णु भंगाळे :- आम्ही तटस्थ आहोत.

श्री.रियाज बागवान :- तटस्थ

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि. ०४/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०९ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ :- ०४**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** ई-निविदा सुचना क्रं.१४१९ जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तद्नंतर अन्टी रेबीज लसीकरण देवून कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी AWBI मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणे कामी मक्तेदार मे. लक्ष्मी इन्सिटयुट ऑफ वेल्फेअर, राठी नगर, अमरावती यांचे वाटाघाटीअंती आलेले दर रक्कम रु.१०२५/- प्रती श्वान या प्रमाणे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन याकामी येणाऱ्या खर्चास व अधिनियमातील प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तद्नंतर अन्टी रेबीज लसीकरण देवून कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी AWBI मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणे कामी महासभा ठराव क्रं.३४ दि.०७/१२/२०१८ अन्वये मंजूर रक्कम रु.१.५० कोटी रक्कमेची तरतूद अंदाजपत्रकात करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सन २०१९-२० मध्ये ३ वेळा निविदा प्रसिध्द करुन त्यास कोणत्याही प्रतिसाद न मिळाल्याने आयुक्त यांचे दि.३०/०५/२०१९ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१४१९ सन २०१९-२० आरोग्य

वि./जा.क्र./४४३/२०१९-२० दि.२३/०८/२०१९ अन्वये दैनिक लोकमत या वृत्तपत्रात (चौथी वेळ) प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर कामाचे नाव, अंदाजीत रक्कम, इसारा अनामत, निविदा शर्ती, इत्यादी बाबत परिपुर्ण माहिती www.maharashtra.etenders.in तसेच Sub portal : https://jmc. maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर उपलब्ध होती.

त्या अनुषंगाने लिफाफा क्रं.१ (तांत्रिक लिफाफा) दि.०३/०९/२०१९ रोजी ई-निविदा समिती समोर उघडले असता १ ई-निविदा प्राप्त झालेल्या असून उक्त कामांच्या प्राप्त झालेल्या ई-निविदा मधील कागदपत्रांची निविदा समिती पुढे छाननी केली असता निविदाकार मे.लक्ष्मी इन्सिटयुट ऑफ वेल्फेअर, राठी नगर, इमरावती यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांच्या आधारे ई-निविदा समितीच्या अहवालानुसार पात्र दिसून येत आहे.

उक्त कामाचे प्राप्त झालेले १ निविदाकार यांचे आर्थिक दरांचा लिफाफा क्रं.२ निविदा समितीच्या मान्यतेने दि.०४/०९/२०१९ रोजी उघडण्यात आलेले असून ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|
| १. | जळगांव शहरातील भटकी व मोकाट कुत्र्यांच्या तक्रारी निवारण करुन त्याबाबतचा लेखी अहवाल म.न.पा.स सादर करणे. G.P.S.Tag (Latitude longitude फोटो काढून DVD स्वरुपात प्रत्येक महिन्यात सादर करणे. | प्रती श्वान प्राप्त दर रु.१०३५/- |
| २. | मोकाट व भटकी कुत्री पकडणे (डॉग व्हॅन्स व त्यावरील कर्मचारी संस्थेचे स्वत:चे असावेत) पकडण्यात आलेली कुत्री बंद वाहनातून AWBI मान्यता प्राप्त संस्थेकडे शस्त्रक्रियेसाठी सुपुर्त करणे. | |
| ३. | Sterilisation of stray dogs, Post Operative care & Knotching of ears after operation (inclusive of Antibiotics + ointments+catgut +Anesthesia along with Food for ५ days | |
| ४. | निर्बीजीकरण शस्त्रक्रिया झाल्यानंतर अटी रेबीज लसीकरण केल्यानंतर कानावर V नॉज किंवा व इतर नमुना म.न.पा.कडून प्रमाणित करुन ज्या जागेवरुन सदर कुत्रे | |

वरील तक्ता पहाता निविदाकार मे.लक्ष्मी इन्सिटयुट ऑफ वेल्फेअर, राठी नगर, अमरावती यांचे सर्वात कमीचे (न्युनतम) दर रक्कम रु.१०३५/- प्रति श्वान दर प्राप्त झालेले आहेत. प्रस्तुत निविदा प्रक्रियेतील निविदाकार यांचेकडून दराचे विश्लेषण (वाटाघाटीअंती) करणे करिता आरोग्य वि/४९७/२०१९ दि.०४/०९/२०१९ रोजी निविदाकार यांना ई-मेल व्दारे पत्र पाठविण्यात आलेले असुन त्यांनी सदर पत्राच्या अनुषंगाने रु.१०२५/- प्रती श्वान या दरात काम करणेस सहमती दर्शविलेली असुन दरांचे कार्यात्मक विश्लेषण खुलासा ई-मेल पत्राव्दारे सादर केलेले आहेत.

शहरातील भटकी व मोकाट कुत्री पकडुन (प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६०, महाराष्ट्र संरक्षण प्राणी कायदा १९७६ आणि प्राणी उत्पत्ती प्रतिबंधक कायदा २००१ नुसार) नसबंदी शस्त्रक्रिया करणे तद्नंतर अन्टी रेबीज लसीकरण देवून कानावर V नॉच करुन पकडलेल्या पुर्ववत ठिकाणी कुत्रे सोडणेकामी AWBI मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणे कामी मक्तेदार मे. लक्ष्मी इन्सिटयुट ऑफ वेल्फेअर, राठी नगर, अमरावती यांचे वाटाघाटीअंती आलेले दर रक्कम रु.१०२५/- प्रती श्वान या प्रमाणे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन याकामी येणाऱ्या खर्चास व म.न.पा. अधिनियमातील प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव:- विषय क्र.** ३) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजूरी देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरण पत्रात आरंभिची शिल्लक रु.५१,४९,५३,९७७ -/व भाग अ व क ची एकुण रक्कम रु.२०८,८५,१४,९०७/- मात्र इतकी रक्कम जमा असुन झालेला खर्च रक्कम रु.२१७,८६,९०,०१५/- मात्र इतका आहे .वर्ष अखेर शिल्लक रक्कम रु.४२,४७,७८,८६९/- इतकी आहे .सदर शिल्लकेत जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव चे शेअर्स ची रक्कम रु.२,८१,७८,१००/- मात्र दर्शविलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ )१ (चे तरतुदी नुसार सन २०१८-१९ चा वार्षिक हिशोबास मान्यता प्रदान करण्यात येत आहे .

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव:- विषय क्र.** ४) दि.०४/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्रं.९ ठराव क्रं. १५६ दि.०४/०९/२०१९ अन्वये सदस्यांना अभ्यास करणे कामी स्थगीत ठेवणेत आलेला विषय:- आव्हाणे शिवार गट नं.८६४ येथे स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत मंजुर घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची उभारणी करणे कामी लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी लि.औरंगाबाद यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ नुसार निविदा स्विकारण्यास व त्या कामी येणारा रक्कम रु.१४,४४,३२,८३५/- खर्चास तसेच प्राप्त दरानुसार निविदा रकमेपेक्षा जादा होणारा खर्च रु.२,२९,५८,६२६/- स्वच्छ भारत अभियानाच्या १४ व्या वित्त आयोगातील निधीतुन खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय, दि.२२/१२/२०१७ महासभा ठराव क्र.८२० एक ठराव झालेला होता. त्या संदर्भात आव्हाणे शिवारात जो काही आपला संकलीत झालेला कचरा आहे. विषय क्र.४ आणि विषय क्र.५ प्रकल्प उभारणी करीता आहे. दोन्ही विषयांचे अनुषंगाने नाशिकची एक कंपनी होती इशान वेस्ट मॅनेजमेंट फर्म होती. त्यावेळेला आयुक्त श्री.किशोर राजे निंबाळकर साहेब होते आणि अतिरिक्त आयुक्त म्हणुन श्री.कानडे साहेब होते. आणि प्रशासनाचा हा प्रस्ताव महासभे समोर चर्चेला आलेला होता आणि त्याच्यावरती सदरहु कंपनीला जो काही आपला घनकचरा तेथे पडलेला होता, लाख दोन लाख तिन लाख टन कचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि तो प्रकल्प स्वत: कंपनीने उभारणे आणि तो प्रकल्प २० वर्ष त्याने कार्यान्वीत ठेवावे. असा प्रस्ताव सदरहु कंपनी इशान वेस्ट यांनी दिलेला होता. प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर या सभागृहाने सर्वानुमते निर्णय घेतलेला होता. कचऱ्याचे विल्हेवाट लावणे पासुन प्रकल्प उभारणेसाठी महानगरपालिकेला कुठल्याही खर्चाची तरतुद महापालिकेवर येणार नव्हती. आणि या प्रस्तावावरती सर्व सभागृहाने आणि सदस्यांनी निर्णय घेतला. आपण एखाद्या कंपनीला विना निविदा अश्या पध्दतीने प्रकल्प उभारणी करण्याच्या संदर्भात आणि त्या कचऱ्याचा विल्हेवाट करण्याच्या संदर्भात काम देत आहे तर प्रकल्प महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अत्यंत योग्य आहे. कदाचित कुठेतरी विना निविदा राबवता कशी तरी कुठेतरी प्रकल्पाला मंजुरी देणे योग्य होईल का ? त्योवेळेला श्री.कानडे साहेबांनी सांगितले जर सभागृहात सदस्यांना अश्या पध्दतीची शंका असेल तर सदरहु प्रस्तावाला आपण राज्यशासनाकडुन पुर्व मान्यता घेऊ. कारण या महानगरपालिका एक रुपये ही लागणार नाही. प्रकल्प ही उभारले जाईल, कचऱ्याची विल्हेवाट ही लावली जाईल आणि भविष्यात ही आर्थिक बोझा पडणार नाही. तर अश्या प्रकारे राज्य शासनाची पुर्व परवानगी घेऊन असा क्रमांक ८२० चा हा ठराव पारित करण्यात आला होता. असे असतांना तत्कालीन आयुक्त श्री. किशोर राजे निंबाळकर यांनी सदरहु प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सुध्दा पाठविलेला आहे. फक्त राज्य शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे. कदाचित जर त्या प्रस्तावाचा योग्य पध्दतीने विचार झाला तर पुढचा विषय क्र.५ याच्यात साधारणता १५ कोटी रुपये आपल्याला लागणार आहे. बायोमाईनींग चा खर्च दिसुन येत नाही. परंतु रु.३६०/- पर क्युबीक मिटर टन प्रमाणे आपण तो खर्च कंपनीला देणार आहोत. साधारणता खर्च किती येईल पाटील साहेब ४ कोटी ६७ लक्ष बायोमाईनींगसाठी खर्च होणार आहे. आज पडलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेस ४ कोटी ६७ लाख खर्च होणार आहे. नविन प्रकल्प उभारणीसाठी १५ कोटी रुपये म्हणजे साधारणता जवळपास २० कोटी रुपये आर्थिक गुंणतवणुक या कचऱ्याची विल्लेवाट लावण्याच्या दृष्टीकोणातुन होणार आहे. परंतु सदरहु कंपनीच्या प्रतिनिधींचा मला फोन आला होता. ते याच भ्रमात होते की आमचा झालेला ठराव आणि आमच्या झालेल्या ठरावाचे अनुषंगाने सदरहु प्रकरण मान्यतेसाठी राज्य शासनाकडे प्रलंबित आहे. ज्या वेळेला त्यांना कळलं की अश्या पध्दतीने जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये धोरणात्मक निर्णय राबविला जात आहे. मी त्यांना विचारले की पुर्वी तुम्ही जे प्रस्ताव

दिलेला होता त्याच धरतीवर तुमची आज सुध्दा तयारी आहे का ? म्हणजे महापालिका तुम्हाला एक रुपया देणार नाही. तुम्ही महानगरपालिकेला एक रुपया द्यायचा नाही. त्यांनी आज सुध्दा हीच गोष्ट मान्य केली की आम्हाला फक्त जी जागा आहे ती जागेला कंपाऊंड वॉल करुन पाहिजे. ही अट त्या वेळेलाही होती आणि ती आज ही आहे. म.न.पा.ने तेथे इलेक्ट्रीक फिटींगची व्यवस्था करुन द्यायची. इलेक्ट्रीसीटीचा बिल सदरहु कंपनी म्हणजे मक्तेदारच भरणार आहे.पाणीची व्यवस्था करुन द्यावी. पाण्याचा सुध्दा नियमाप्रमाणे खर्च जे मनपा लावेल तो सुध्दा खर्च कंपनी भरण्यास तयार आहे. म्हणजे भविष्यात महानगरपालिकेचा कुठलाही एक रुपया खर्च न होता या सर्व कचऱ्यावरती बायोमाईनिंगची प्रक्रिया होणार किंवा ज्या ही पध्दतीने त्यांना विल्लेवाट लावायची असेल प्लास्टीक वेगळा, माती वेगळी, लोखंड वेगळा, या पध्दतीने किंवा जे ही पध्दतीने ते विल्लेवाट लावतील तर यासाठी त्या कंपनीची आजही तयारी आहे. काल ते येऊन गेले येथे पण काल आयुक्तांशी त्यांची भेट झाली नाही. मी सांगितले, आपला जे काही प्रस्ताव असेल ते आपण रितसर आयुक्तांकडे द्यावा आयुक्त योग्य तो निर्णय घेतील. परंतु मला असे वाटते की, आज हे निर्णय घेऊन मनपाचा २० कोटी रुपयांचा आर्थिक नुकसान करणे ही बाब योग्य नाही. सर्व या संदर्भात पत्र व्यवहार माझ्याकडे आहे आपल्याकडे ही असतील. त्याच्यावर तुम्हाला सर्व गांभिर्य लक्षात येईल. मनपाची साधारणता २० कोटी रुपयांची बचत होईल जर आपण साधारणता या विषयावर विचार केला तर सोईचे होईल ऐवढीच माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा.सभापती :-** पाटील साहेब नितीन भाऊ जसं सांगत आहे तसा प्रस्ताव आपण पाठवु शकता का ?

**श्री.उदय पाटील :-** आदरणीय सभापती साहेब, नितीन भाऊंनी जो विषय मांडला त्या संदर्भात शासनाकडे आपले डि.पी.आर.मंजुर होण्या आगोदर इशान वेस्ट मॅनेजमेंट, श्री.भालेराव म्हणुन यांचा एक पत्र प्राप्त झाला होता. त्यासोबत काही दस्तऐवज प्राप्त झाले होते. २० वर्षाकरीता आहवाणे शिवारातील कचरा प्रकल्प आम्हाला चालविण्यासाठी द्यावा असा प्रस्ताव आहे. सदरचा प्रस्ताव तत्कालीन महापौर यांनी मांडला होता आणि महासभेने सुध्दा त्याला मान्यता दिली होती. महासभेने मान्यता देण्यापुर्वी त्याच्यात स्पष्ट म्हटले होते की, शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन त्या ठरावाला मान्यता देण्यात येत आहे. सुरवातीला असे होते की, एखाद्या व्यक्तीचं व्यक्तीक प्रस्ताव करुन शासनाला पाठविलेला होता. याच्या संदर्भात ज्या ज्या वेळेला मी पाहत फिरलो शासन स्थरावर श्री.लोंडे म्हणुन आपले कक्ष अधिकारी आहे. ते म्हणे असा ठराव करणे आणि असा ठराव तयार करुन पाठविणं ही बाब चुकीची वाटत आहे. जर तुम्हाला असा ठराव करायचं होता तर ते जाहिर निविदा काढुन तसाच शक्य आहे. त्यांनी मला सांगितले की, असा प्रस्ताव मान्य करता येणार नाही. ह्या प्रस्तावानंतर शासनाने शासनाचे डि.पी.आर.ची एक एजन्सी नेमली. इकोफो म्हणुन त्या एजन्सीने हा डि.पी.आर. तयार केला. त्यास शासनानेच त्याला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिली. त्या कंपनीचे जे श्री.भालेराव होते ते त्याचा पाठपुरावा करत होते. तर शासन स्थरावर परिपुर्ण अहवाल सादर करणेबाबत आपण त्यांन पत्र ही दिलेला आहे. आपल्या रेकार्डला आहे ते पत्र. परंतु एकच विषयासाठी दोन गोष्टींना मान्यता देता येणार नाही. हे रेकॉर्ड नाही. पण ही जी चर्चा झाली या मुळे या प्रस्तावास मान्यता मिळणार नाही. आणि त्याला मान्यता नाही म्हणुन शासनने आपल्याला हा डि.पी.आर. तयार करुन दिला. आणि ह्या डि.पी.आर.च्या अनुषंगाने दुसरी गोष्ट त्यात बऱ्याच गोष्टी होत्या. की एखाद्या एजन्सीने प्रस्ताव दिल्यानंतर ती एजन्सीची ईफीसियन्सी किती आहे. या पुर्वी त्या एजन्सीने काम केलेले आहे का त्यांना या कामाचा अनुभव आहे का ? त्या असा परिपुर्ण प्रस्ताव नव्हता त्यामुळे आपण हा निर्णय घेतला.

**श्री.नितीन लढढा :-** मा.सभापती महोदय, प्रस्ताव परिपुर्ण असला किंवा नव्हता आज मोठा विषय २० कोटी रुपयांचा आहे आणि अशा पध्दतीने निविदा प्रक्रीया मध्ये कोणीही सहभागी होत असेल म्हणजे त्यावेळेला हि भुमिका मी स्वत:च मांडली होती की डायरेक्ट त्या एजन्सीला देण्याऐवजी त्यावेळेला मा.आयुक्त निंबाळकर साहेबांनी त्यांचीच ईच्छा होती कारण जो प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता तो प्रशासनानेच पाठवलेला होता तर यामध्ये महानगरपालिकेचा आर्थिक २० कोटी रुपयांचा जर कधी फायदा होत असेल तर त्याच्यासंदर्भात पुर्नविचार करण्यात अडचण काय आहे काय होईल जास्तीत जास्त काय आहे जानेवारी मधील निविदा प्रक्रीया आहे अजुनपर्यंत त्या निविदा प्रक्रीया पुर्ण लागली गेली नाहीत आणि महिन्या दोन महिन्यात आपण जर या अटी शर्तीसह निविदा प्रक्रीया राबवली तर नक्कीच महानगरपालिकेला आज जर महानगरपालिकेला ईशान इंडस्ट्रिज च्या अनुषगांने महानगरपालिकेला नुकसान एक रुपयाचं ही नाहीये तो जी रक्कम भरणार आहे तर १०० टक्के फायदा हा महानगरपालिकेचाच आहे कारण गुंतवणुक १०० टक्के मक्तेदारच करणार आहे. तर हया निविदेमुळे महानगरपालिकेला २० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान आहे.

**श्री.उदय पाटील :-** भाऊ आपण ज्यावेळेला ही जी निविदा प्रक्रीया केली त्यावेहेला आपण त्यांना जाणीवपुर्वक सांगीतलेले होते की अशी ही परिस्थिती आहे तर त्यांनी त्यात भाग घेतला नाही आणि दुसरी गोष्ट केंद्राच्या ज्या गाईडलाईन्स आहे की लवकरात लवकर निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे कारण शासनाचे जे अनुदान आहे २०२० पर्यंत पुर्ण करायचे आहे .

**श्री.नितीन लढढा :-** मान्य आहे की शासनाने आपल्याला अनुदान दिले आहे परंतु पैसा खर्च होणारच आहे ना प्रकल्प उभारणी सुध्दा तोच करणार आहे, कचऱ्यावर प्रक्रीया सुध्दा तोच करणार आहे त्यांच्या संदर्भात तुम्हाला गुंतवणुक सुध्दा करायची नाहीये तुम्हाला पैसा सुध्दा त्याला द्यायचा नाहीये म्हणजे याअर्थी आपण जरी घेवुन गेले याची चिंता सुध्दा आपल्याला करायची नाहीये आणि या निविदा आपण दुसऱ्या पध्दतीने राबवु शकतात ना या प्रस्तावावरती आपण जर सभापती महोदय .

**मा.सभापती :-** पाटील साहेब त्यांच्याशी बोलणे पण झाले होते ना आपले ?

**श्री.नितीन लढढा :-** तुम्ही जर म्हणत असाल

**मा.सभापती :-** आज जर ही निविदा प्रक्रीया होतेय

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही काय झालेय सभापती महोदय की त्याच प्रकरण शासनाने अद्याप पावेतो नामंजुर केले नाही तसे पत्र आले आहे का तुम्हाला राज्य शासनाचे नामंजुर केल्याचे ? शासनाकडुन जो प्रस्ताव पाठविला होता तो नामंजुर होवुन आला का ?

**श्री.उदय पाटील :-** तसे कुठलेही पत्र आलेले नाही परंतु मला मौखिक सांगीतले आहे.

**श्री.नितीन लढढा :-** नाही तसे नसते की जर समजा त्याला सन्मा.लोकप्रतिनिधींनी , पदाधिकारी , पालकमंत्र्यांना याची जाणीव करून दिली असती की अशी अशी राज्य शासनाकडे आम्ही परवानगी मागीतलेली आहे ज्याच्यामध्ये महानगरपालिकेचा मोठा आर्थिक फायदा होणार आहे राज्य शासनाकडुन त्याला ताबडतोब मान्यता मिळाली असती आणि आजही राज्य शासनाकडे प्रलंबित असल्याकारणाने की मक्तेदाराचे फक्त हेच म्हणणे होते की राज्य शासनाने .

**मा.सभापती :-** पाटील साहेब तो जो प्रस्ताव आपण तेथे पाठविलेला आहे त्याच्यावर पुढे काय झाले आहे किंवा काही खुलासा आला का ?

**श्री.उदय पाटील :-** भाऊ आपल्याला संबंधित मक्तेदाराने पत्र दिले होते की माझ्या पत्रावर आपण काय कार्यवाही केली आपण त्याला त्या पत्राच्या अनुषंगाने खुलासा दिलेला आहे .

**श्री.नितीन लढढा :-** नाही पाटील साहेब मक्तेदाराला खुलासा देण्याचा प्रश्नच नाहीये राज्य शासनाकडे जो प्रस्ताव प्रलंबित आहे त्याच्या संदर्भात काही पत्र आले आहे का . आणि ते दिसुन येत नाही किंवा त्याच्यावरती ज्या पध्दतीने प्रयत्न असायला पाहीजे होते तश्या पध्दतीने प्रयत्न न करता आज हा पैसा महानगरपालिकेचा २० कोटी रुपयांचा पैसा महानगरपालिकेचा किंवा राज्य शासनाचा किंवा केंद्र शासनाचा पैसा म्हणा .

**श्री.उदय पाटील :-** भाऊ मी बोलु का ?

**श्री.नितीन लढढा :-** राज्य शासनाने जर कधी परवानगी नाकारली असती राज्य शासनाने सांगीतले असते की असे हे देता येणार नाही कमीत कमी तो विषय तेथे संपुष्टात आला असता झाले काय आहे की राज्य शासनाकडे परवानगी साठी विषय प्रलंबित आहे आणि तो एक विषय प्रलंबित असतांना आपण दुसरी निविदा प्रक्रीया ईकडे राबवतो आहे आणि त्यानिर्णय प्रक्रीयेमध्ये कोट्यावधी रुपयांची गुंतवणुक होणार आहे मला एक सांगा की आपला राज्य शासनाकडे पडलेला आहे आपण हा विषय जसा तहकुब ठेवलेला होता तसा तुम्ही लागले तर त्याला अजुन तहकुब ठेवा व राज्य शासनाकडुन तुम्ही परवानगी साठी तुम्ही प्रयत्न करा मिळाली तर आनंद आहे.

**मा.सभापती :-** नाही काय आहे त्यावेळेला माहिती घेतली ना .

**श्री.नितीन लढढा :-** काय आहे सभापती साहेब तुम्ही , नामदार साहेब यांनी तिथे प्रयत्न केले आणि राज्य शासनाने सांगीतले की परवानगी देता येणार नाही आणि चुकीची आहे कारण तुम्ही स्वत: तो प्रस्ताव पहा तयार केलेला .

**मा.सभापती :-** पाटील साहेब याच्यावर काय खुलासा आहे तो करावा.

**श्री.उदय पाटील :-** याच्यामध्ये हा प्रस्ताव दिल्यानंतरच आपल्याला डिपीआर मंजुर केलेला आहे हा डिपीआर मंजुर केलेला आहे याचाच अर्थ हा प्रस्ताव नाकारला आहे असे म्हणता येईल.

**श्री.नितीन लढढा :-** कसे आहे पाटील साहेब त्यांनी तो डीपीआर मंजुर केला

**मा.सभापती :-** काय आहे साहेब

**श्री.उदय पाटील :-** डीपीआर ला शासनाने मान्यता दिलेली आहे आणि शासनाने त्याच्या अनुषगांनेच मान्यता दिली आहे ज्यावेळेला डिपीआर मंजुर झाला त्यावेळेला हा विषय होवु शकला असता परंतु अद्याप पोवेतो आता हे बघा हा प्रस्ताव तयार करायला १७/१८/१९ म्हणजे तीन साढेतीन वर्ष झाले त्याबाबत शासनाकडुन आपल्याला कुठलेही पत्र नाही.

**श्री.नितीन लढढा :-** डिपीआर किती मंजुर केला आपल्याला त्याला किती वेळ झाला , आपल्याला सगळयांनाच शासनाचा अनुभव आहे आपल्या महानगरपालिकेमध्ये स्वत: सदस्य १०-१० वेळा बोलतात १०-१० वेळा बोलुन सुध्दा एकही काम होत नाही शेवटी शासनआहे ते त्याची व्यापकता माहिती आहे आपल्याला की कीती मोठी आहे म्हणजे काय मला काही घेणेदेणे नाहीये परंतु मी म्हणतोय की महानगरपालिकेचा पैसा असेल किंवा राज्य शासनाचा असेल किंवा केंद्र शासनाने निधी दिलेला असेल तुम्ही याची उपयुक्तता पाहीली पाहीजे कारण आपण त्यांना पत्र दिले आहे किशोर राजेनिंबाळकर साहेबांनी राज्य शासनाकडे पाठविलेले पत्र आहे त्या प्रस्तावाला अजुन नाकारले सुध्दा नाही आपल्या मनात काय आहे हे कुठेच कळत नाही आणि आपण विषय सुध्दा मंजुर करू शकता त्याबद्दल काही वाद नाहीये .

**मा.उपायुक्त (आरोग्य):-** मा.सभापती महोदय , मा.सभागृह आता हे विषय पैकी एक विषय सीडीपी मार्फत कडुन आले आहेत आणि दुसरा विषय हा आरोग्य विभागाकडुन आहे परंतु मागच्या मिटींगला पोकळे साहेबांनी विचारले होते की जुने प्रकरण दिले होते त्याच्यामध्ये आपल्याला त्या कंपनीचे विनंती पत्र आलेले होते तर त्या अनुषंगाने मी जुनी नस्ती असेल किंवा जुना शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव असेल तसेच झालेला ठराव असेल याचा अभ्यास मी केलेला आहे या ठिकाणी त्या एजन्सीने आपल्याला जे प्रपोजल दिले की २० वर्षांसाठी हा जो प्लॅन्ट आहे तो तिथे आम्ही कार्यरत करणार आहोत त्यावर मा.उपायुक्त यांच्या वरती जनरल बॉडीने त्यावर निर्णय पण दिलेला आहे आणि त्यामध्ये शेवटचे एक वाक्य आहे की शासनाची मान्यता घ्यावी .अशी अट आहे त्यामध्ये त्या अनुषंगाने ते प्रकरण डिसेंबर २०१७ ला शासनाकडे सादर झालेले आहे त्याच्यानंतर उदय पाटील जे सांगताहेत की त्यांनी स्मरणपत्र दिलेले आहे परंतु २०१५ नंतर त्यावेळी स्वच्छ भारत अभियान सुरू झालं सुरुवातीच्या काळात मी त्याच्यावर काम केलेलं आहे की कोणकोणत्या नगरपालिका कोणकोणत्या महानगरपालिका मध्ये घनकचरा कलेक्शन असेल , वाहतुक असेल आणि त्याची प्रक्रीया असेल मी त्याच्यावर काही रिपोर्ट तयार करून तो नगरविकास ला दिलेला होता त्यामध्ये शासनाच्या असे लक्षात आले होते की आम्हाला अडचणी आणि प्रकल्प संकलानाच्या असतील , वाहतुकीच्या असतील महानगरपालिका , नगरपालिकेमध्ये असे प्रकल्प सुरू झालेले आहेत जिथे सुरू झालेले आहेत बऱ्याच अंशी बदल याच्यामध्ये आहेत आणि घनकचरा प्रक्रीया हा जो काही प्रकल्प आहे त्याचे जे डंम्पींग आहे त्याची एक मोठी समस्या आहे त्यामुळे केंद्र शासन असेल किंवा मग राज्य शासनामार्फत महानगरपालिका व नगरपालिकांना सविस्तर प्रकल्पासाठी त्यामध्ये कचऱ्याचं संकलन असेल , वाहतुक असेल आणि प्रक्रीया असेल यासाठी आवश्यक असलेली सगळी यंत्रणा याच्यावरचा संपुर्ण अहवाल राज्य शासनाने मंजुर केलेला आहे आणि आपले प्रकरण राज्य शासनाकडे सादर केलेले असतांना ही त्याच्यानंतरच्या कालावधीमध्ये आपला डिपीआर मंजुर केलेला आहे आणि मला वाटते की प्रक्रीया व व्यवस्था ही लवकर व्हावी म्हणुन हा डिपीआर मंजुर केलेला आहे आणि त्यामध्ये केंद्र शासन , राज्य शासन आणि महापालिकेचा हिस्सा अश्याप्रकारे अनुदान हे मंजुर झालेले आहे आणि हा प्रकल्प राबवणे गरजेचे आहे असे वाटते .

**श्री.नितीन लढढा :-** दंडवते साहेब हा प्रकल्प राबवु नये असे तर म्हणत नाहीये ना मी झाले काय आहे की २०१७ ला या सभागृहाने या संबंधात निर्णय घेतलेला होता एक नाशिकची ईशान असे काहीतरी नांव आहे त्या कंपनीने एक प्रस्ताव दिलेला होता तत्कालीन जिल्हाधिकारी किशोर राजेनिंबाळकर साहेब आणि तत्कालीन आयुक्त होते डांगे साहेब प्रशासनाच्या माध्यमातुन तो प्रस्ताव या सभागृहाच्या समोर आला होता आणि त्याच्यामध्ये की संपुर्ण प्रकल्पाची उभारणी पासुन जो काही खर्च होता प्रक्रीयेच्या बाबतीत ती जबाबदारी कंपनीने दर्शविली होती , महानगरपालिकेला एक रुपयाची गुंतवणुक करायची गरज नाही संपुर्ण बीओटी तत्वावर होणार होता आणि सभागृहाने तो प्रस्ताव मान्य केला त्यावेळी त्या सभेमध्ये मी सुचना मांडली होती की ,अशापध्दतीची कोणी ऑफर दिली आणि ती या सभागृहाने ॲक्सेप केली उद्या त्याच्यावरती ऑब्जेक्शन होईल प्रस्ताव मनपाच्या आर्थिक हिताचा होता व मनपाचे नुकसानही नव्हत त्याच्यामध्ये परंतु ज्यापध्दतीने आज आम्ही रोखतोय त्या पध्दतीची शंका मनामध्ये आहे म्हणुन ही सुचना मी सभागृहामध्ये मांडली की प्रस्ताव मान्य करण्यात यावा आणि प्रस्ताव मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन योग्य आहे , परंतु कार्यादेश देण्याच्या पुर्वी राज्य शासनाची त्याला मान्यता घ्यावी जेणेकरून सभागृहातील सदस्यांनी घेतलेल्या मताच्या अनुषंगाने केलेल्या चुकीच्या कामाबाबत जबाबदारी निश्चित होवु नये हा त्याचा मागचा हेतु होता . आणि त्या ठरावाच्या अनुषंगाने किशोर राजेनिंबाळकर यांनी तसा परिपुर्ण प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीस्तव पाठविलेला आहे म्हणुन प्रस्ताव पाठविल्यानंतर त्यावरती ज्या पध्दतीने पाठपुरावा होणे अपेक्षित असते . समजा उदय पाटील म्हणतात की मी दोन वेळा पत्र व्यवहार केले आणि शासनाकडे दोन पत्र व्यवहार केले की निवाडे होतात असे होत नाही सातत्याने तिथे जबाबदार व्यक्तीने जाऊन पाठपुरावा केला तर निर्णयापर्यंत ते प्रशासन येतं आजही ती कंपनी म्हणजे ती कुणालाही भेटेल पण मी बोललो की या संदर्भात तुम्ही आयुक्त साहेबांना भेटा तुमचं कन्सेंप्ट काय आहे त्यांचे म्हणणे हे आहे की त्यांनी जो प्रस्ताव दिलेला होता त्यावर आजही आम्ही स्टॅंडअप आहे त्रास कोणाला आहे की आज आम्ही महानगरपालिकेला मागणी केली व त्यावर निर्णय परवानगी साठी प्रस्ताव प्रलंबित असल्याकारणाने आम्ही महानगरपालिकेकडे परवानगी साठी संपर्क करतो परंतु असा दुसरा प्रस्ताव आल्यानंतर ते तक्रार करण्याच्या दृष्टीकोनातनं ते जळगांव ला आलेत मी म्हणालो की तुम्ही आयुक्त साहेबांना तसे लेखी द्या व त्यांना भेटाही कारण एक बायोमॅट्रीक व घनकचराचा विषय आहे आणि दुसरा प्रकल्प उभारण्याच्या संदर्भातला आहे म्हणजे ही साधारणत: २० कोटी रुपयांची महानगरपालिकेची गुंतवणुक होणार आहे साहेब हा मक्तेदार यालाच द्या असे नाहीये यालासुध्दा कायद्याच्या चौकटीत बसविण्याच्या संदर्भातली जी भुमिका आम्ही मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविलेली होती ती याच कारणाने पाठविली होती की डायरेक्ट करणे योग्य होणार नाही म्हणुन मंजुरी घ्यायची एकतर प्रलंबित असलेल्या विषयावरती मंजुरी घेणे अन्यथा या धर्तीवरती की जो कोणी प्रकल्प उभारेल त्यांचा संपुर्ण खर्च त्याचा संपुर्ण जमा झालेल्या कचऱ्यावर प्रक्रीया करण्याची जबाबदारी त्याची अश्या पध्दतीची निविदा प्रक्रीया सुध्दा आपण राबवु शकतो की ज्याच्या मध्ये हा किंवा त्याच्या पेक्षा अजुन कोणी चांगला मक्तेदार

असेल म्हणजे कुठली दुसरी पार्टी म्हणत असेल की आम्ही सर्व प्रक्रीया करू आणि महानगरपालिकेला शुल्क सुध्दा देवु अशी सुध्दा निविदा होवु शकते अश्या पध्दतीने निविदा प्रक्रीया होवु शकते महानगरपालिकेचे किंवा केंद्र शासनाचे किंवा राज्य शासनाचे २० कोटी रूपये त्याच्यात वाचतील असे माझे म्हणणे आहे याच्यावर काय निर्णय घ्यायचा आहे तो सभागृहाने घ्यावा.

**मा.आयुक्त :-** सभापती महोदय , उपस्थित सर्व सन्मा.सदस्य आत्ता नितीनजी लढढा यांनी घनकचरा व्यवस्थापनच्या संदर्भात जी माहिती दिली आणि अश्या प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचं सांगीतलं मला अतिशय प्रस्ताव चांगला दिसतोय तर त्याच फायनान्शील मॉडेल काय आहे हे माझ्या लक्षात आले नाही आता ५ महिने मला झाले पण एखादी जर २०१७ पासुन जर निविदा असेल आणि त्यांची खरच काम करायची ईच्छा असेल तर ते २०१९ पर्यंत का वाट पाहता आहेत हे माझ्या लक्षात आले नाही मी संचालक , स्वच्छ महाराष्ट्र अभियान असतांना कानडे साहेबांशी माझी चर्चा झाली होती आणि आम्ही त्यांचे फायनान्शील मॉडेल विचारले होते की कुठली एजन्सी कोणती मशिनरी लावणार आहे त्यानंतर प्रक्रीया नेमकी काय करणार आहे आणि त्याच्यासाठी येणारा खर्च नेमका कुठुन करणार कारण असं म्हटंल जात की **There is nothing free in the world** त्यामुळं एखादी गोष्ट मोफत होतेय पण ती प्रत्यक्षात होणार आहे का याचा एक विचार करणं गरजेचं आहे त्यामुळे त्याठिकाणी आठवडयाला आमच्या मिटींग व्हायच्या आणि महाराष्ट्रातले असे बरेच प्रस्ताव यायचे घनकचरा व्यवस्थानाच्या संदर्भात सन २००० ला हे नियम लागू झाले आणि त्यानंतर वेगवेगळया महानगरपालिका , नगरपालिकांनी असे वेगवेगळे मॉडेल हे केले पण कुठलेहि मॉडेल हे यशस्वी झालेलं नाही त्यानंतर केंद्र शासनाने असा निर्णय घेतला की आपण निधी उपलब्ध करून दिला पाहीजे तर त्याचे निश्चित परिणाम दिसतील आणि त्यानंतर प्रत्येक शहरांचा डिपीआर तयार करण्यात आला आणि त्याला मान्यता देण्यात आली त्यामुळे या एजन्सीला आपले काम करायचे असतील तर आपल्याकडे अजुन बरेच काम आहेत अश्या पध्दतीचे असतील तर आपण सुध्दा त्यांच स्वागत करायला पाहीजे जे कोणी प्रतिनिधी असतील जर ते आले असतील तर आपण चर्चा सुध्दा त्यांच्याशी करूया पण डिपीआर आणि अंतर्भुत बाबी आहेत तर त्या करणं आपल्याला गरजेच आहे.

**श्री.नितीन लढढा :-** माझे म्हणणे काय आहे की ती एजन्सी येथे आलेली आहे आजही तुम्ही बोलु शकाल आज हा निर्णय हे सभागृह घेईल हे दोन दिवसांनंतर ही घेवु शकतात हे असे काही नाही आज निर्णय झाल्यास

**मा.आयुक्त :-** राज्य शासनाकडे याची चर्चा झाली .

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही

**मा.आयुक्त :-** फक्त ते लेखी स्वरूपात दिलेलं नाही पण त्यावर कार्यवाही काय झाली हे सांगता येणार नाही नेमका खर्च किती येणार आहे ते उपलब्ध कसा करणार आहे जर १४ कोटीचं काम एखादा माणुस विनामुल्य करतोय असे तर पहिली शंका निर्माण होते की असे का ?

**श्री.नितीन लढढा :-** माझे म्हणणे ते नाहीये .

**मा.आयुक्त :-** काय असतं सीएसआर च्या माध्यमातुन करतोय तर आपल्याला विश्वास ठेवायला थोडं हे होतं .

**श्री.नितीन लढढा :-** माझा काही त्याच्यामध्ये एक नयापैशाचा काही फायदा नाहीये या जर ही निर्णय प्रक्रीया तुम्ही आज राबवता आहेत तशी मागे चार दिवसांपुर्वी चर्चा झाली तसे दोन दिवस तुम्हाला वाटते की फायनान्शीयल मॉडेल वाटत असेल तर असे कारण मी या संदर्भात त्यांच्याशी तशी काही चर्चा केलेली नाही त्यावेळी प्रशासनाकडुन प्रस्ताव आला योग्य वाटला मान्यता दिली तांत्रिक अडचणी येवु नये म्हणुन आपण त्या अनुषगांने त्यावेळेला ही भुमिका सुध्दा त्यावेळी आली होती की त्या कंपनीला काम देवुन कार्यादेश देण्यात यावे. परंतु तांत्रिक अडचण उदभवु नये म्हणुन शासनाच्या अटी शर्तीच्या अनुषंगांने त्यावेळी तो निर्णय घेण्यात आलेला होता आज जर कधी तुमच्या मनामध्ये ज्या काही फायनान्शील मॉडेल्स असतील की कश्या प्रकारे तो हा प्रकल्प यशस्वीरित्या राबवु शकेल या गोष्टींच शंका निरसण व समाधान झाले मग निर्णय घेवु कसे आहे हा प्रस्ताव तुम्ही दोन दिवसांनंतरही मंजुर करू शकतात .

**मा.आयुक्त :-** नाही मी जे म्हणालो ना की इतर जे प्रकल्प आहेत किंवा कामे आहेत ती आपण त्यांच्या कडुन करू त्यानंतर काही शंका निरसण करायचा प्रश्न नाही ना .

**श्री.नितीन लढढा :-** दुसरा विषय नाही हा जो प्रस्ताव सभागृहासमोर आलेला आहे त्या विषयाच्या अनुषगांने बोलतोय म्हणजे या विषयावरती पाणी सोडुन द्यायच आणि दुसऱ्या विषयावर बोलत असायच हा काही व्यवहारीक दृष्टया योग्य नाही ना

**मा.आयुक्त :-** आपण जो विषय करताय आणि तो विषय आज दोन वर्षानंतर येतोय हेच व्यवहारीक नाही मुळात

**श्री.नितीन लढढा :-** अहो राज्य शासनाकडे तुम्ही परवानगी साठी किती वेळा पत्र व्यवहार केला साहेब तुम्ही सोडा की या महानगरपालिकेवर आयुक्त पदावर बसल्यानंतर at least कमीत कमी निर्णय जरी आला असता की राज्य शासनाने मान्य केलेलं आहे की हा प्रस्ताव व्यवहारीक नाही. अश्या पध्दतीने देता येणार नाही. परंतु कोणी प्रयत्न करत नाही. फक्त थातुर मातुर दोन पत्र पाठवुन दिले.

**मा.आयुक्त :-** पत्राचा विषय नाही. या बाबत चर्चा त्या ठिकाणी स्वच्छ भारत अभियानात झाली होती.

**श्री.नितीन लढढा :-** राज्य शासन एक दोन ओळीचे पत्र देऊ शकत नाही का ?
**मा.आयुक्त :-** असे किती तरी देणार. ३४४ महानगरपालिका आहे. असे प्रस्ताव येऊ शकत नाही.
**श्री.नितीन लढढा :-** जर त्यावेळेला त्याची व्यथा यजर राज्य शासनाकडे पटवुन दिली असती. तर त्यांनी परवानगी दिली असती. आता पर्यंत काम सुरु होऊन त्याचा आऊटपुट ही मिळाला असता.
**मा.सभापती :-** या सभागृहानी या विषयावर..
**श्री.नितीन लढढा :-** आमचा विरोध आहे या विषयाला आणि या संदर्भात या अनुषंगाने ज्या काही आर्थिक जबाबदाऱ्या निश्चित होतील.ती जबाबदारी मतदान करणाऱ्यांवरती राहील.
**श्री.रियाज बागवान :-** आमचा ही विरोध आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगाव महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प अहवालानुसार कामे सुरू करणेसाठी स.नं. ८६४ आव्हाणे शिवार येथे (हंजीर बायोटेक प्रकल्प) घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी शासन निर्णय क्रं. स्वमअ-२०१८/प्र.क्रं.४७/नवि-३४ दिनांक ०१.०३.२०१८ अन्वये रू.३०.७५ कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्रं.०२ अन्वये मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. सदर जागेवर असलेले पुर्वीचे भंगलेले शेडचे बांधकाम हे पाडण्यासाठी महासभा ठराव क्रं.३५ दिनांक ०७.१२.२०१८ अन्वये मान्यता यापुर्वीच मिळालेली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश प्रदान करण्यात आला आहे.

घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी स्थापत्य कामांची एकत्रित रक्कम रू.१२,१४,७४,२०९/-इतकी आहे. सदर कामासाठी यापुर्वी ०२ वेळा राष्ट्रीय हिंदुस्तान टाईम्स व राज्य स्तरीय दैनिक लोकमत वृत्तपत्रातून निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तिसऱ्या वेळेस दिनांक १७.०७.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार विहीत कालावधीत ई- निविदा क्रं.१३७२ मध्ये १) लक्ष्मी सेल्स कॉर्पोरेशन प्रा लि, नाशिक व २) लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी लि. औरंगाबाद या ०२ निविदाकारांनी सहभाग घेतला.

निविदाकार यांचे प्राप्त तांत्रिक कागदपत्रांची पडताळणी केली असता, लक्ष्मी सेल्स कॉर्पोरेशन प्रा लि, नाशिक या निविदाकाराने आर्थिक ताळेबंद, उपलब्ध मनुष्यबळ, यंत्रे, भविष्य निर्वाह निधी नोंदणी, रू.१००/- मुद्रांक पेपरवर अनुसची -अ, अनुसुची-ब, अनुसुची-क, अनुसुची-ड, अनुसुची-ई, १०० टन क्षमतेच्या प्रक्रिया प्रकल्पाचे काम केल्याचा अनुभव, निविदाधारकाची निविदा भरण्याची सक्षमता, सॅनिटरी लँडफील तयार केल्याचा अनुभव ही कागदपत्रे सादर न केल्याने तांत्रिक पडताळणीत अपात्र करण्यात आलेली आहे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी लि. औरंगाबाद याची निविदा पडताळणीत पात्र असुन त्यांचे अंदाजित रकमेवर १८.९९% जास्तीचे देकार प्राप्त झालेले आहे.

मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता वाटाघाटी अंती मूळ भरलेले दर १८.९९ टक्के जास्त दरांत ०.०९ टक्के दर कमी करून १८.९० टक्के जास्तीचे दर दिलेले आहेत. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २०१६-२०१७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. त्यानुसार या कामाची निविदा रक्कम रू. १२,१४,७४,२०९/- इतकी आहे. मक्तेदार यांनी वाटाघाटी अंती तांत्रिक मान्यता, मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक पत्र क्रं.मुअ/नाशिक/चिशा/२०३८/२०१७ दि.२७/१०/२०१७ चे पत्राअन्वये दराबाबत खुलासा दिलेला असुन प्रचलित दरसुची सन २०१९-२० नुसार निविदेतील बाबींची तुलना केली असता खालील प्रमाणे वाढ झालेली दिसुन येते.

१) निविदेनुसार कामाची रक्कम - रू. १२,१४,७४,२०९/- (दरसुची सन २०१६-२०१७)
२) आजमितीस प्रचलित दरानुसार कामाची रक्कम - रू.१५,०४,०७,७६५/-(दरसुची सन २०१९-२०२०)

३) मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांनी निविदेत भरलेले दर - निविदा रकमेवर १८.९० % जास्त
४) मक्तेदार यांनी भरलेल्या दरानुसार काम करण्यास येणारा खर्च - रू.१४,४४,३२,८३५/-
५) प्राप्त दरानुसार निविदा रकमेपेक्षा येणारा जास्तीचा खर्च - रू.२,२९,५८,६२६/-
६) प्रसिध्द निविदेतील खर्चाची दरसुची (२०१६-१७) व प्रचलित दरसुची (२०१९-२०)यातील तफावतीनुसार

कामास जादा येणारा खर्च - **रू.२,८९,३३,५५६/-**

**७)** निविदेत प्राप्त दराची आजमितीस प्रचलित दरसुचीनुसार येणाऱ्या खर्चाशी तुलना केली असता आलेले दर - प्रचलित दरसुचीनुसार येणाऱ्या खर्चाच्या ४.९१ % कमी.

वरील प्रमाणे मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांचे प्राप्त निविदा दर १८.९० % जास्त हे प्रचलित दरसुचीनुसार येणाऱ्या खर्चाशी तुलना केली असता, प्रचलित दरसुचीनुसार येणाऱ्या खर्चाच्या ४.९१% कमीचे आहेत. तरी सदर कामी ३ ऱ्या वेळेस निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.१२१ (भाग-२)/इमारती-२ दिनांक १९.०९.२०१७ नुसार दुसऱ्या बोलीच्या वेळेस एकच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमित कार्यवाही करावी.

सदर कामाची निकड लक्षात घेता मक्तेदार लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी औरंगाबाद यांचे निविदा रकमेवर १८.९०% जास्तीचे प्राप्त झालेले दर हे प्रचलित दरसुचीशी तुलना केली असता, वाजवी व योग्य असल्याने सदर कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३ नुसार निविदा स्विकारण्यास, संविदा करण्यास तसेच याकामी येणारा खर्च रक्कम रू. १४,४४,३२,८३५/- ला व या कामी प्राप्त दरानुसार निविदा रकमेपेक्षा होणारा जादाचा खर्च रू.२,२९,५८,६२६/- स्वच्छ भारत अभियानाच्या १४ व्या वित्त आयोगातील चिन्हांकीत निधीतून करणेस मान्यता मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०९** **प्रतिकुल मते :- ०४**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र.** ५) दि.०४/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्रं.७ - ठराव क्रं. १५४ दि.०४/०९/२०१९ अन्वये सदस्यांना अभ्यास करणे कामी स्थगीत ठेवणेत आलेला विषय:- ई-निविदा सुचना क्र.१३४४ स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापनांतर्गत आव्हाणे शिवारातील लँडफील साईटवर पुर्वीपासुन साठवलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोमायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेव्दारे कचऱ्याचे पुनरुस्थान (Reclamation) करुन निरोपयोगी कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी L१ निविदाकार Global Waste Management Cell Pvt.Ltd. यांनी दिलेले दर रक्कम रु.३५९/- per cum (१५.७२% below) सर्वात कमीचे प्राप्त दर स्विकृत करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मागच्या वेळेस हा विषय तहकुब केलेला होता. आपण चौकशी करण्यासाठी ह्या विषयाची चौकशीची मागणी केलेली होती. ती चौकशी केली का.

**मा.उपायुक्त, (आरोग्य):-** मा.सभागृह, बायोमाईनींगच्या विषयात मागच्या मिटींगमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे आणि या संदर्भात मा.सभापती यांनी मला ०५ तारखेला लेखी पत्र ही दिलेलं होतं. या संदर्भात मा.आयुक्त साहेब यांच्याशी झालेल्या चर्चा प्रमाणे, कराड आणि पंढरपुर या ठिकाणी यांचे मुख्याधिकाऱ्यांना वेळोवेळी दुरध्वनी वरुन संपर्क साधलेला आहे. आणि त्यांच्याकडे जे काम चाललेलं आहे. तर त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले डॉक्युमेंट दिलेले आहे. आज सकाळी ते डॉक्युमेंटस मला उपलब्ध झालेले आहेत आणि सभापती महादेयांना ते डॉक्युमेंटस सादर करीत आहे याच्यामध्ये पंढरपुरचा तांत्रिक व फीजीकल तपासणीचा रिपोर्ट आहे आणि कराड च्या संदर्भामध्ये मुख्याधिकारी यांनी आपण जी माहिती मागीतली होती त्या अनुषगांने त्यांनी अंबरनाथ मुख्याधिकाऱ्यांना जो काही रिपोर्ट दिलेला आहे त्या पत्राची छायांकीत प्रत या ठिकाणी दिलेली आहे .

**मा.सभापती :-** त्यांचे काम समाधानकारक आहे किंवा असमाधानकारक आहे याचा खुलासा करून द्यावा.

**मा.उपायुक्त, (आरोग्य):-** याच्यामध्ये पंढरपुरचा जो तांत्रिक तपासणीचा रिपोर्ट आहे तो गर्व्हमेंटचे जे तंत्रनिकेतन आहे त्यांनी तो दिलेला आहे त्याच्यामध्ये त्यांचे रिमार्क आहेत की हे जे काम आहे ते कंम्लीट झालेले आहे म्हणजे फीजीकल प्रोग्रेस त्यांचा १०८ टक्के आहे आणि त्याच्यामध्ये वेंडींग , पॅकींग आणि स्टोरेज हया मध्ये जी काही कामे असतील ती कामे एक्सपायलेशन सिरींग आणि रिजेक्ट ॲडजीम्स आहेत त्याच्यामध्ये त्यांनी १०० टक्कयापेक्षा जास्त काम केलेले आहे असे त्या रिपोर्ट मध्ये दिसुन येत आहे . दुसरे असे की मुख्याधिकारी कराड यांनी मुख्याधिकारी अंबरनाथ यांना जे काही पत्र पाठविलेले आहे त्या पत्रामध्ये न्युसेव मॅनेजमेंट ॲन्ड इंजिनियरींग प्रा.लि.पुणे यांनी कराड नगरपालिकेकडे

बायोमायनिंगचे काम केले असल्याने त्यांच्या कामाची अनुपालनाबाबत विचारणा केली होती मुख्याधिकारी , अंबरनाथ यांच्या पत्रान्वये नगरपरिषद , कराड कार्यालयाने न्युसेव मॅनेजमेंट ॲन्ड इंजिनियरींग प्रा.लि.पुणे यांनी केलेल्या कामाचा अनुभव पाहता त्यांचे काम असमाधानकारक असलेबाबतचा अहवाल दि.०८/०७/२०१९ अन्वये दिलेला होता दि.२५/०८/२०१९ नंतर संबंधित एजन्सीने त्यांचे मनुष्यबळ व सामग्री वापरून बायोमायनिंग चे काम समाधानकारक पुर्ण केलेले आहे असे पत्र मुख्याधिकारी , कराड नगरपरिषद यांनी अंबरनाथ नगरपालिकेस दिलेले पत्र आपल्याला दिले आहे .

**सौ. उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय परिस्थिती काय आहे सगळयांना कळलेली आहे आणि ज्या काही अटी , शर्ती आपण केलेल्या असतील या करारनाम्यात त्याप्रमाणे त्यांच्याकडुन काम करून घेणे ही पुर्णपणे प्रशासनाची जबाबदारी असेल व हा प्रकल्प योग्य रितीने राबविला गेला पाहीजे याच्यासाठी प्रशासन जबाबदार राहील व काही अडचणी आल्यास जबाबदारी राहील व हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**ॲड .शुचिता हाडा :-** आयुक्त साहेब , सभापती महोदय खरतर हे काही दृष्टया दुर्देव आहे की अस एखादे टेंडर किंवा निविदा आपल्याकडे सादर करतात टेक्नीकली तपासुन हा प्रस्ताव आपल्याकडे येतो पण त्याच्यासंदर्भात आपल्याकडे काही कंम्पलेंट आली आहे या धर्तीवर विषय लांबत राहणार हेही योग्य वाटत नाही कारण तक्रार आलेली आहे तक्रार प्रत्येकाबद्दल असु शकते तक्रार ही ऑब्जेक्शन आहे शेवटी हा बिझीनेस आहे कारण असे आहे की हे लोक व्यवसाय करणारे आहेत कुणाचे तरी दुसऱ्याचे काम होवु नये म्हणुन खोडा घालतात ही मानवी प्रवृत्ती आहे आणि मला तरी वाटते की फार लक्ष द्यायची गरज नाहीये आणि म्हणजे आपल्याकडे तसे ऑनपेपर , रेकॉर्डवरही आलेले आहे त्याच्याबद्दल बरेच कामचे पत्र आलेले आहेत आणि ईथे मी आयुक्त साहेबांना विचारू ईच्छिते की सिडीसी बाबत टेंडर भरण्याच्या राज्य व केंद्र शासनाच्या काही गाईडलाईन्स असतात आणि मला वाटते त्यानुसारच टेंडर प्रक्रीया ही गाईडलाईन नुसारच होत असते तर त्यानुसारच आपली ही प्रक्रीया राबविली गेली आहे की नाही म्हणजे त्यानुसारच होणार आहे का .

**मा.आयुक्त :-** सिडीसी च्या बाबतीत ज्या काही शासनाच्या सुचना आहे त्या शासनाशी संबंधित ज्या काही संस्था आहेत महाराष्ट्र राज्य शासनाचे जे काही नियम आहेत व आपल्या कायद्यात जे काही तरतुदी आहेत ती निविदा प्रक्रीया ते करतील पण ज्यावेळेला अशा शंका किंवा प्रश्न निर्माण होतात त्यावेळी सिडीसी गाईडलाईनचा उपयोग त्यावेळी केला जातो .

**ॲड .शुचिता हाडा :-** या कामासंदर्भात पुढे काही प्रश्न निर्माण झाले सिडीसीचे गाईडलाईन फॉरवर्ड करू शकतो हा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी काहीही हरकत राहीलेली नाहीये आणि हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आमचा विरोध आहे .

**मा.सभापती :-** या संबंधी आपले जे खाते प्रमुख असतील किंवा जे उपायुक्त असतील जसे आपण या करारासंबंधी माहिती मागवली त्या संबंधी काम समाधानकारक केले केव्हा की त्याला पत्रव्यवहार केला तेव्हा अशी घटना घडायला नको , असे जर झाले तर याची जबाबदारी प्रशासनावर राहील असे आपण घ्या.

**श्री.सुनिल खडके :-** प्रोसेडिंग मध्ये नमुद करा आणि सर याच्याबाबत आपल मत काय आहे .

**मा.आयुक्त :-** मी त्या दिवशीच सांगीतले आपल्याला परत नविन काही नको.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय असे करता येते का ? म्हणजे अशी ऑफर दिली आणि याची जबाबदारी प्रशासनावर राहील अस होवु शकत का ? याचे उत्तर हव फक्त

**मा.सभापती :-** एक प्रकार डोळयासमोर आपल्या आहे हे दाखवा त्या भाऊंना

**श्री.नितीन लढढा :-** परंतु काय आहे की सदस्यांनी जे मांडले आहे शेवटी निर्णय प्रक्रीया राबविण्याचे काम सभागृहाचं आहे .धोरणात्मक निर्णय किंवा आर्थिक निर्णय

**मा.सभापती :-** सदस्यांनी जे मांडले आहे जसं आता त्याने याच्यात म्हटलं होत की त्यांने काम मध्येच सोडलं होत त्यानंतर पत्रव्यवहार केल्यानंतर त्याने ते पुर्ण केलं ती दक्षता आपल्याकडे घ्यावी हीच .

**श्री.नितीन लढढा :-** कस आहे सभापती महोदय की प्रशासनाच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्या ते पार पाडणारच आहे आणि ते पार पाडत असतात जर कधी एखाद्याच्या बाबतीत या सभागृहाच्या मनामध्ये एक शंका उपस्थित होते त्यावरती निर्णय सकारात्मक घ्यायचा किंवा नकारात्मक घ्यायचा तो अधिकार शेवटी या सभागृहाचाच आहे सभागृहाने चुकीचा निर्णय घेतला तरी प्रशासनाला पुढच्या काही हे होणार नाही परंतु अशा प्रकारे प्रशासनावर जबाबदारी निश्चित करून म्हणजे निर्णय आपण घ्यायचा.

**श्री.सुनिल खडके :-** भाऊ आयुक्त जबाबदारी घेवु शकतात ना हे बघा तुमच्या हातुन सुध्दा चुका झाल्या आहेत त्या आमच्या हातुन होवु नये अस सर्वांना वाटत शेवटी काय आहे प्रशासन मध्ये आयुक्त साहेब बसलेले असतात ते सर्व अधिकार त्यांना असतात ना सर्व अधिकार कोणाचे असतात ते सर्व आयुक्त साहेबांचे असतात जर ते आम्ही मागीतल तर त्यात गैर काय आहे .

**श्री.नितीन लढढा :-** नाही नाही तसं नाही .

**मा.सभापती :-** भाऊ आपला विषय समजला आणि त्यात आपल्याला प्रॉब्लेम आलेला आहे ते आपल्याला मान्य आहे ना .

**श्री.नितीन लढढा :-** मी काय म्हणतोय विषय तो नाहीये जास्तीत जास्त तुम्ही काय म्हणु शकता की झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे प्रशासनाने करावी आणि जबाबदारी निश्चित म्हणजे काय निर्णय तुम्ही घेतात आणि प्रशासन जबाबदार अस होवु शकत नाही कारण काय आहे शेवटी निर्णय सभागृह घेते सभागृह हे सर्वोच्च आहे आणि सभागृहाला माहिती आहे की हा विषय योग्य आहे.

**सौ.उज्ज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय आपण प्रस्तावावर निर्णय घेतलेला आहे .

**श्री.नितीन लढढा :-** सभागृह निर्णय घेत आहे तर मग काय .

**मा.सभापती :-** आपण या विषयावर पुढच्या सभेत बोलु .

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे.

**श्री.रियाज बागवान :-** विरोध आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, शासन मान्य सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) च्या अनुषंगाने घनकचरा प्रकल्पावरील बायो-मायनिंग ऑफ ओल्ड डंम्प वेस्ट १.० लक्ष क्यु.मी. घनकचऱ्यावर घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापनांतर्गत आव्हाणे शिवारातील लँडफील साईटवर पुर्वीपासून साठवलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने बायोमायनिंग (Bio-Mining) प्रक्रियेद्वारे कचऱ्याचे पुनरुस्थान (Reclamation) करुन निरोपयोगी कचऱ्याची विल्हेवाट लावणे कामी महासभा ठराव क्रं. ७७३ दि.१६/१०/२०१७ अन्वये मंजूर रक्कम रु.३०.७५ कोटी रक्कमेतून रक्कम रु.४.२६ कोटी खर्चास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील जा.क्र. / मुअ / नाशिक / ताशा-२ / तां.मा. / ३०४९ /२०१८ दि.२७/१२/२०१८ नुसार दि.२७/१०/२०१७ ची तांत्रिक मंजूरी रद्द करुन सुधारीत तांत्रिक मंजूरी रु.३०,३५,३१,४७४/- किंमतीच्या घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पास विवरणपत्र अ.क्र. १ ते ३४ मधील अ.क्र. ३१ (बायो-मायनिंग) जळगांव शहरामध्ये प्रक्रिया न करता साठवलेल्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याच्या अनुषंगाने राबविण्यात येणारी बायो-मायनिंग प्रक्रिया राबविणेसाठी ४,२६,७९,३७५ रक्कमेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने आयुक्त यांचे दि.३०/०५/२०१९ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं. १३४४ सन-२०१९-२० आरोग्य वि./जा.क्र./१५७/२०१९-२० दि.३१/०५/२०१९ नुसार ई-निविदा राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरीय प्रसिध्द करण्यात आली. तसेच म.न.पा.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

दि.१५/०६/२०१९ रोजी निविदापुर्व बैठकीत (Pre - bid meeting) ईच्छुक निविदाधारकांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचे विचार करता निविदेतील जाचक अटी शिथील केल्यास स्पर्धात्मक निविदा प्राप्त होवून म.न.पा. आर्थिक हित जोपासले जाईल. करीता सदरच्या दुरस्त्या करुन Bid preparation दि.२६/०६/२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेस व शुध्दीपत्रक (Corrigendum) आयुक्त यांच्या दि.१८/०६/२०१९ च्या मान्यतेने www.maharashtra.etenders.in तसेच Sub portal : https://jmc.maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले होते.

विहित केलेल्या मुदतीत संकेतस्थळावर फक्त दोन निविदा प्राप्त झालेल्या असल्याने शासन निर्णयानुसार स्पर्धात्मक किमान तीन निविदा प्राप्त होणेसाठी Bid preparation करीता दि.०८/०७/२०१९ पावेतो www.maharashtra.etenders.in तसेच Sub portal : https://jmc.maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर वर आयुक्त यांचे दि.२७/०६/२०१९ च्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झालेल्या एकूण ५ ई-निविदाकारांच्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | **निविदाकाराचे नांव** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कामाचे नांव | Global Waste Management Cell Pvt.Ltd. | Shree Samartha Sales. | Janadhar Sevabhavi Sanstha, Latur | Gurukrupa Enterprises | Sadguru Bagdebaba Enterprises |
| १. | RFP for The Work of Scientific Dumpsite Land Reclamation through Bio-mining, Resource Recovery and Scientific Rejects Disposal at SWM PROJECT AUHANE SHIVAR GAT NO 864 | ३५९/- per cum | ३९०.५०/- per cum | ३९६.७३/- per cum | ४१८.०६/- per cum | ४१९.७६/- per cum |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Jalgaon | | | | | |
| | | L१ | L२ | L३ | L४ | L५ |

तुलनात्मक तक्ता पहाता निविदाकार Global Waste Management Cell Pvt.Ltd. यांचे १५.७२ % below सर्वात कमीचे (न्युनतम) दर रक्कम रु. ३५९/- per cum दर प्राप्त झालेले आहेत. प्रस्तुत निविदा प्रक्रियेतील निविदाकार L१ निविदाधारक Global Waste Management Cell Pvt.Ltd. यांचेकडून दराचे विश्लेषण करणे करिता दि.१४/०८/२०१९ रोजी आयुक्त यांचे दालनात समक्ष झालेल्या चर्चेअंती **L१** निविदाकार Global Waste Management Cell Pvt.Ltd. पुणे यांनी निविदेत सादर केलेले न्युनतम (रु.३५९/- per cum) दरातच गुणवत्ता पुर्वक काम करणेस सहमती दर्शविलेली असून दरांचे कार्यात्मक विश्लेषण खुलासा पत्र सादर केलेले आहे.

श्री.प्रशांत रामचंद्र हिरे यांनी सभापती स्थायी समिती मनपा जळगांव यांचेकडेस दि.२०/०८/२०१९ रोजी अर्जाव्दारे लेखी तक्रार दिलेली होती. त्या अनुषंगाने सभापती स्थायी समिती यांनी प्रशासनाकडुन खुलासा मागवला असता मक्तेदार यांनी कराड नगर परिषद येथे मोठया प्रमाणात यंत्रसामुग्री व मनुष्यबळ वापरुन बायोमायनिंगचे काम समधानकारकरित्या पुर्ण करुन दिल्याचे मुख्याधिकारी, कराड नगर परिषद कराड यांचे जा.नं.नपा/कावि/३९४२/दि.११/०९/२०१९ चे पत्र प्रशासनाने संदर्भ क्रं.जमनपा/आरोग्य/जा.क्र./७२२/२०१९ दि.११/०९/२०१९ चे पत्रासोबत दिलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रशासनाने पत्रासोबत कराड नगर परिषद कराड यांचे पत्र पाहाता व प्रस्तावीत केलेल्या कामी आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पहाता **L१** निविदाकार Global Waste Management Cell Pvt.Ltd. यांनी दिलेले दर रक्कम रु.३५९/- per cum (१५.७२ % below) सर्वात कमीचे प्राप्त दर स्विकृत करणेस म.न.पा. अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार तसेच शासन निर्णय नगर विकास विभाग दि.०१ मार्च २०१८ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन मंजूर सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) प्राप्त निधीतून येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०९ प्रतिकुल मते :- ०४**
**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**
**अनुमोदक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**नगरसचिव:- विषय क्र.** ६) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६६ पारित करण्यात आला.**

**असा ठराव करणेत येत आहे** की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.४८ दि.२८/०८/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सालाबाद प्रमाणे सन २०१९-२० मधील श्री गणेश व देवी मुर्तीचे विसर्जन करणेसाठी मेहरुण तलाव येथे व्यवस्था करणे कामी मक्तेदार एस.के कॉन्ट्रक्टर यांचे वाटाघाटी अंती निविदा रकमेपेक्षा ७% जास्तीचे दर रक्कम रु.५,२०,८५२/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १३ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- जादा विषय क्र.१ )** ई-निविदा सुचना क्रं.१४११/२०१९ नुसार The Selection of Agency for conducting IEC (Information,Education and Commmunication) and supporting SWM activities for jalgaon city municipal corporation) कामी संस्थेची निवड करणे कामी बिग व्ही

टेलिकॉम प्रा.लि.नागपुर यांचे सर्वात कमीचे प्राप्त दर रु.७८/- प्रती घर अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १३.८१% कमीचे दर स्विकृत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चेतन सनकत :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य आहे.

**विष्णु भंगाळे :-** आम्ही तटस्थ.

**श्री.रियाज बागवान :-** तटस्थ.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, ई-निविदा सुचना क्रं.१४११/२०१९ नुसार The Selection of Agency for conducting Public Awareness (Information,Education and Commmunication) and supporting SWM activities for jalgaon city municipal corporation ) कामी शासनाकडील मंजूर D.P.R मधिल Public awareness (ICE) या शीर्षासाठी महासभा ठराव क्रं.७७३ दि.१६/१०/२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र./मुअ/नाशिक/चिशा/२०३८/२०१७ दि.२७/१०/२०१७ नुसार रु.३०,७५,१६,३६९/- किंमतीच्या घनकचरा प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पास विवरणपत्र अ.क्र.१ ते ३४ व अटी शर्तीस अधीन राहून तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली सबब विवरणपत्रातील अ.क्र.३४ नुसार Public awareness Programme (माहिती, शिक्षण व संवाद I.E.C.) च्या माध्यमातून शहरातील नागरीकांमध्ये घनकचरा व्यवस्थापन २०१६ च्या अनुषंगाने जनजागृती, प्रचार व प्रसार करणे कामी रक्कम रु.१ कोटी खर्चास मान्यता प्राप्त आहे.

आयुक्त यांचे दि.०९/०८/२०१९ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१४११ सन २०१९-२० आरोग्य वि./जा.क्र./४००/२०१९-२० दि.१६/०८/२०१९ अन्वये शासन निर्णयानुसार जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर कामांचे नांव, अंदाजीत रक्कम, इसारा अनामत, निविदा शर्ती, इत्यादी बाबत परिपुर्ण माहिती www.maharashtra.etenders.in तसेच Sub portal : https://jmc.maharashtra.etenders.in या संकेत स्थळावर उपलब्ध होती.

त्या अनुषंगाने ३ ई-निविदा प्राप्त झालेल्या असून ई-निविदा समितीच्या अहवालानुसार पात्र असल्याचे दिसून येत आहे. उक्त कामाचे प्राप्त ३ निविदाकार यांचे ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | महिला हौसिंग सेवा ट्रस्ट अहमदाबाद | हायटेक इलेक्शन मल्टी सर्व्हिसेस कंपनी नाशिक | बिग व्ही टेलिकॉम प्रा.लि.नागपुर |
|---|---|---|---|---|
| १. | The Selection of Agency for conducting IEC (Information,Education and Commmunication) and supporting SWM activities for jalgaon city municipal corporation) | - | रु.८९.५०/- प्रती घर | रु.७८/- प्रती घर |

तुलनात्मक तक्ता पहाता निविदेतील अट क्रं.३.३.१ व ४.१.३ नुसार महिला हौसिंग सेवा ट्रस्ट अहमदाबाद यांनी लिफाफा क्रं.२ मध्ये दर सादर केलेले नाहीत त्यामुळे उर्वरीत दोन एजन्सीच्या दरांची तुलना केली असता Big V Telicom प्रा.लि.नागपुर यांचे दर लघुत्तम आहे त्यामुळे L१ निविदाधारक बिग व्ही टेलिकॉम प्रा.लि.नागपुर यांचे सर्वात कमीचे (न्युतम) प्राप्त दर रु.७८/- प्रती घर अंदाजपत्रकिय रक्कमेच्या १३.८१% कमीचे दर स्विकृत करणेस म.न.पा अधिनियम प्रकरण ७ संविदा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करणेत येत आहे.

तसेच प्रस्तावीत कामी शासन निर्णय नगर विकास विभाग दि.०१ मार्च २०१८ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन मंजूर संविस्तर प्रकल्प अहवाल (D.P.R) प्राप्त निधीतून येणाऱ्या खर्चास तसेच L१ निविदाधारक बिग व्ही टेलिकॉम प्रा.लि.नागपुर यांचेशी करारनामा (संविदा) करुन (Work order) देणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेश नुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ०९ प्रतिकुल मते :- ०० तटस्थ :- ०४**

**सुचक :- कापसे मयुर चंद्रकांत**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे. राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**